ISSN No. 2394-9996

# New Vision

## Multi-disciplinary Research Journal

July 2015

Online version : http://www.milliyaresearchportal.com

Anjuman Ishat-e-Taleem Beed's
Milliya Arts, Science & Management Science College,
Beed- 431122 (Maharashtra)
Website : www.milliyacollege.org
E-mail ID :

| Sr. No. | Paper Name | Name | Subject | Page No. |
|---|---|---|---|---|
| (21) | Comparison of Self-Concept on Different Levels of Participation in football Players | Mr. Parvez Khan<br>Dr. Sk Ataullah Jagirdar | Physical Education | 92 |
| (22) | Comparative Study of Health Related Physical Fitness Among girls of Maharashtra | Dr. Saudagar Faruk Gafur<br>Dr. Sk Ataullah Jagirdar | Physical Education | 97 |
| (23) | Relationship between playing ability of Handball Players and Motor fitness Components. | Mr. Sayyad Shanoor Noor. | Physical Education | 103 |
| (24) | दौलताबाद किल्ल्याचे महत्व | प्रा. डॉ. शेख कलीम मोहियोद्दीन | History | 109 |
| (25) | 1857 च्या राष्ट्रीय उठावात मौलवी अहमद उल्ला शाहचे योगदान | प्रा. शेख हुसैन इमाम | History | 111 |
| (26) | मानवी जीवनात आहार आणि खेळाचे महत्व | प्रा. जाधव एस.बी. | Home Science | 114 |
| (27) | Maharashtra ke Qadeem Deeni Idare | Dr. Abdus Shukoor Quasmi | Arabic | 116 |
| (28) | "Nazr-e- Butan" Ek Mutale'a | Prof. Syed Fareed Ahmed Nahri | Urdu | 120 |
| (29) | Jamiya Osmaniya Aur Urdu Taleem | Dr. Syed Asfiya Madni | Urdu | 125 |
| (30) | Urdu Gazal Mein Hindustani Tahezibi wo Ma'ashrti Pas Manzar | Dr. Maqbool Saleem Shaikh Mahtab | Urdu | 129 |

ISSN No. 2394-9996

# १८५७ च्या राष्ट्रीय उठावात मौलवी अहमदउल्ला शाहचे योगदान

प्रा:शेख हुसैन इमाम
मिल्लिया महाविद्यालय बीड

प्रस्तावना: १७५७ मध्ये प्लासीची लढाई झाली.आणी बंगालचा नवाब सिराज्जुदौलाला पराजित करून लॉर्ड क्लाईव्हने भारतात इंग्रजांची सत्ता स्थापन केली.१०० वर्षाच्या कालावधीत इंग्रजांनी देशातील सगळया राजघराण्यांना पराभूत करून आपले साम्राज्य स्थापन केले.दिल्लीच्या मोगल बादशहाच्या सत्तेविषयी असे म्हटले जाउ लागले की 'शहाअलम दिल्ली पासून पालम पर्यंत'मराठयांची शक्ती नष्ट होउन नानासाहेब पेशवेंना कानपूर जवळ बिठूर येथे कैद केले होते.पंजाबमध्ये शिखांचे राज्य समाप्त झाले होते.आणी रणजिंत सिंहाचा अल्पवयीन मूलाला ख्रिश्चन बनून त्याला इंग्लडला पाठवमन दिले.भारताचा बराचसा भाग इंग्रजांच्या अधिकार क्षेत्रात आला होता.भारतातील ५०० च्या वर सत्तांनी इंग्रजांचे प्रभूत्व मान्य केले होते.

एक इंग्रज इतिहासकार लिहितो की आम्ही भारतावा सत्ता प्रज्ञतापित केली नाही तर भारतीयांनी एकएक प्रदेश जिंकूण आमच्या हवाली केला.इस्ट इंडिया कंपनीमध्ये इंग्रज सैन्य कमी होतेजास्त सैनिक तर भारतीय होते.विशेषतः उत्तर प्रदेश आणी बिहार मधील होते.यांच्या साहयाने इंग्रजांनी या देशात आपले साम्राज्य स्थापन केले.१८५७मध्ये याच सिपायाच्या विद्रोहामुळे इंग्रजांच्या पायाखालची जमीन सरकली होती.मंगल पांडेने या विद्रोहाची सुरूवात केली होती.ता याच सिपायामधील एक होता.परंतू या सिपायामध्ये असा कोणीही नव्हता की तो यांचे नेतृत्व करू शकेल.हैद्राबाद,भोपाल,ग्वालियर,जयपूर,पटियाला,जम्मु कश्मीर इत्यादी राज्यांनी इंग्रजांच्या अधिपत्याखाली रहाने पसंद केले.आणी या उठावात त्यांनी इंग्रजांना सहकार्य सुध्दा केले.मेरठ पासून या उठावाला सुरूवात होउन हे सिपाई दिल्लीला पोहचले.त्यांनी शहरावर अधिकार मिळवून ब-याच इंग्रजांना संपवले.त्यांनी दिल्लीचा बादशहा बहादूरशहा जफरला आपला नेता बनवले.त्यांनी विचार केला की बादशहाच्या नेतृत्वात सर्व स्तरातील तत्वांना एकत्र करू शकतो.परंतु बादशहा अपयशी ठरला.त्यामुळे कानपूर मध्ये नानासाहेब पंशवा,तात्या टोपे,झासीमध्ये राणी लक्ष्मीबाई पूर्वांचल मध्ये कुवरसिंह अवध तथा रूहेलखंडामध्ये मौलवी अहमदउल्ला शाह यांनी संघटीत होउन उठावाला गती देण्याचे काम केले.

इ.स.१८५७च्या उठावाचा जेव्हा इतिहास लिहीला जातो तेव्हा तात्या टोपे नानासाहेब पेशवे राणी लक्ष्मीबाई कुवरसिंह यांचाच इतिहासात जास्त उल्लेख आलेला पाहवयास मिळतो.परंतु मौलवी अहमदउल्ला शाहच्या कामगिरीकडे कोणाचेही लक्ष जात नाही.ज्या इंग्रज इतिहासकारांनी यानंतर पुस्तके लिहीलीत्यामध्ये रणकुशलमा,संघटन,अदभूत विरता यासाठी मौलवी अहमदउल्ला शाहचे कौतुक केलेले दिसते.वीर सावरकर यांनी आपल्या १८५७चे स्वातंत्र्य समरमध्ये म्हटले आहे की 'अहमदशहाने आपल्या दृढता आणी विरतामुळे इंग्रजांच्या नाकात दम करून सोडला होता.'इंग्रजइतिहासकार जी.बी.मालसेन याने त्यावेळीस लिहीले होते की 'मौलवी अहमदउल्ला शाह पहिले स्वातंत्र्य युध्दाचे मुख्य नायकापैकी एक होते. इंग्रजांनी मौलवी अहमदउल्ला शाहचा इतका घसका घेतला होता की इंग्रजांनी त्यांना मृत्य किंवा

जिवंत पकडण्यासाठी ५० हजार रूपये इतका इनाम ठेवला होता.१५० वर्षांपूर्वी ही रक्कम किती मोठी असेल याचा अंदाज आज आपन बांधू शकतो.

मौलवी अहमदउल्ला शाह फेजाबादचे एक प्रतिष्ठित तालुकेदार होते. इंग्रजांनी आपल्या साम्राज्यवादी धोरणामुळे अवधचा नवाब वाजिद अली शहाची सत्ता संपुष्टात आणली.तेव्हा मौलवी अहमदउल्ला शाहचे तालुकेदार पदावरही आपला अधिकार गाजवला. इंग्रज केव्हाही कोणतेही राज्य,जमीनदाराला आपल्या अधिकार क्षेत्रात घेतील याचे कोणतेही कारण नसायाचे.मौलवी अहमदउल्ला शाहचे तालुकदारी घेण्याचेही कोणतेही कारण नव्हेते. इंग्रजांच्या या वागण्याने मौलवी अहमदउल्ला भडकणे स्वभाविकच होते.

इंग्रजांनी असाच प्रयोग भारतातील अनेक भागातील राजे-नवाबासोबत केला होता. सिपायांनी केलेल्या उठावात अशाही लोकांनी आपला असंतोष व्यक्त केला.मौलवी अहमदउल्ला शाहने उत्तर भारतातील अनेक शहरे, आगरा, मेरठ, दिल्ली, पटना, कलकत्ता या शहराचा प्रवास करून असंतुष्ट लोकांना संघठीत करण्याचा प्रयत्न केला. इंग्रजी इतिहासकार मालसेन म्हणतो की '१८५७च्या उठावात भारतात अनेक भागात या उठावाची आग प्रज्वलित करणारा नेता मौलवी अहमदउल्ला शाह होते.' त्यांनी संघटीत केलेल्या शाखा संपूर्ण भारतात पसरल्या होत्या.

मौलवी अहमदउलला शाह मध्ये एक उत्तम योध्दा आणी लेखक हे दोन्हीही गुण त्यांच्यात होते.ते आपला प्रवास करून परत आले तेव्हा त्यांनी क्रांतीकारी पत्रक काढले. त्यामध्ये त्यांनी इंग्रजांची सत्ता उलथून टाकण्याविषयी लिहील होते. हे पत्रक मोठया प्रमाणात वाटले गेले. त्यामुळे इंग्रज फार बैचेन झाले.त्यांनी त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला दाखल करून त्यांना अटक करून फासीची शिक्षा सुनावली.या काळात उठाव भारतभर पसरलेला होता.मौलवी अहमदउल्ला शाह फैजाबादच्या जेल मधून पसार झाले.आणी थेट लखनउला पोहचून वाजिदअली शहाची पत्नी जीनत महलला मिळाले.अवध वर ताबा मिळाल्यानंतर इंग्रजांनी वाजिदअली शाहला कलकत्ता येथे कैदेत टाकले.

बेगम जिनत महल आणी मौलवी अहमदउल्ला शाह यांनी इंग्रजांविरूध्दात युध्द पुकारले. चिनहटच्या युध्दात यांना यश आले. याच काळात मौलवी अहमदउल्ला शाहने रूहेलखंडाला पोहचून संघटन करण्याचा प्रयत्न केला. आठ हजार धोडेस्वार सोबत घेवून ते शाहजहॉनपूरला पोहचले. तेथे इंग्रज सेनापती सर कॉलिन कॅपवेलच्या नेतृत्वाखाली इस्ट इंडिया कंपनीची सेनाकडून पराभूत होउन मौलवी बरेलीला पोहचले. दिल्ली आणी लखनउ हातातून गेल्यानंतर उठावातील सिपायी बरेलिला पोहचले. दिल्लीहून शाहजादा मिर्जा फीरोजशहा, नानासाहेब पेशवा, बेगम हजरत महल, बालासाहेब इत्यादी नेते तेथे पोहचली.

कॅलिन कॅपवेलच्या जवळ आधूनिक शास्त्रास्त्रे,तोफा,सुसज्ज सैना आणी देशी राजे,नवाबांचे सैन्य त्यांच्या मदतीला होती.यामुळे इंग्रजांचा विजय झाला.पण इंग्रजाला अहमदउल्ला शाह नानासाहेब पेशवा यांना पकडू शकले नाही. सर्व प्रकारच्या अपयशानंतरही मौलवी अहमदउल्ला शाहने आपला आत्मविश्वास राखला.

आपल्या विद्रोही सिपायांना एकत्र करून एक निर्णायक युध्द लढण्याची तयारी त्यांनी केली.यासाठी त्यांनी शाहजहॉनपूर जवळ एक छोटे राज्य पुवायाचा राजा जगन्नाथसिंह यांच्याकडे जीनत महलची मोहर लावून एक पत्र पाठवले.आणी भेटण्याची इच्छा व्यक्त केली.पण राजा जगन्नाथ सिंहने पत्राच्या उत्तरात लिहीले की ते मौलवीची स्वतः भेटू घेउ इच्छितो.त्याचे आमत्रण आल्यावर मौलवी अहमदउल्ला शाह एका हत्तीवर बसून पुवायाला पोहचले.तेथे गेल्यावर त्यांना आर्श्चयाचा धक्का

जिवंत पकडण्यासाठी ५० हजार रूपये इतका इनाम ठेवला होता.१५० वर्षापूर्वी ही रक्कम किती मोठी असेल याचा अंदाज आज आपन बांधू शकतो.

मौलवी अहमदउल्ला शाह फेजाबादचे एक प्रतिष्ठित तालुकेदार होते. इंग्रजांनी आपल्या साम्राज्यवादी धोरणामुळे अवधचा नवाब वाजिद अली शहाची सत्ता संपुष्टात आणली.तेव्हा मौलवी अहमदउल्ला शाहचे तालुकेदार पदावरही आपला अधिकार गाजवला. इंग्रज केव्हाही कोणतेही राज्य,जमीनदाराला आपल्या अधिकार क्षेत्रात घेतील याचे कोणतेही कारण नसायाचे.मौलवी अहमदउल्ला शाहचे तालुकदारी घेण्याचेही कोणतेही कारण नव्हेते. इंग्रजांच्या या वागण्याने मौलवी अहमदउल्ला भडकणे स्वभाविकच होते.

इंग्रजांनी असाच प्रयोग भारतातील अनेक भागातील राजे-नवाबासोबत केला होता. सिपायांनी केलेल्या उठावात अशाही लोकांनी आपला असंतोष व्यक्त केला.मौलवी अहमदउल्ला शाहने उत्तर भारतातील अनेक शहरे, आगरा, मेरठ, दिल्ली, पटना, कलकत्ता या शहराचा प्रवास करून असंतुष्ट लोकांना संघठीत करण्याचा प्रयत्न केला. इंग्रजी इतिहासकार मालसेन म्हणतो की '१८५७च्या उठावात भारतात अनेक भागात या उठावाची आग प्रज्वलित करणारा नेता मौलवी अहमदउल्ला शाह होते.'त्यांनी संघटीत केलेल्या शाखा संपूर्ण भारतात पसरल्या होत्या.

मौलवी अहमदउलला शाह मध्ये एक उत्तम योध्दा आणी लेखक हे दोन्हीही गुण त्यांच्यात होते.ते आपला प्रवास करून परत आले तेव्हा त्यांनी क्र ांतीकारी पत्रक काढले. त्यामध्ये त्यांनी इंग्रजांची सत्ता उलथून टाकण्याविषयी लिहील होते. हे पत्रक मोठया प्रमाणात वाटले गेले. त्यामुळे इंग्रज फार बैचेन झाले.त्यांनी त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला दाखल करून त्यांना अटक करून फासीची शिक्षा सुनावली.या काळात उठाव भारतभर पसरलेला होता.मौलवी अहमदउल्ला शाह फैजाबादच्या जेल मधून पसार झाले.आणी थेट लखनउला पोहचून वाजिदअली शहाची पत्नी जीनत महलला मिळाले.अवध वर ताबा मिळाल्यानंतर इंग्रजांनी वाजिदअली शाहला कलकत्ता येथे कैदेत टाकले.

बेगम जिनत महल आणी मौलवी अहमदउल्ला शाह यांनी इंग्रजांविरूध्दात युध्द पुकारले. चिनहटच्या युध्दात यांना यश आले. याच काळात मौलवी अहमदउल्ला शाहने रूहेलखंडाला पोहचून संघटन करण्याचा प्रयत्न केला. आठ हजार धोडेस्वार सोबत घेवून ते शाहजहॉनपूरला पोहचले. तेथे इंग्रज सेनापती सर कॉलिन कॅपवेलच्या नेतृत्वाखाली इस्ट इंडिया कंपनोची सेनाकडून पराभूत होउन मौलवी बरेलीला पोहचले. दिल्ली आणी लखनउ हातातून गेल्यानंतर उठावातील सिपायी बरेलिला पोहचले. दिल्लीहून शाहजादा मिर्जा फीरोजशहा, नानासाहेब पेशवा, बेगम हजरत महल, बालासाहेब इत्यादी नेते तेथे पोहचली.

कॅलिन कॅपवेलच्या जवळ आधूनिक शास्त्रास्त्रे,तोफा,सुसज्ज सैना आणी देशी राजे,नवाबांचे सैन्य त्यांच्या मदतीला होती.यामुळे इंग्रजांचा विजय झाला.पण इंग्रजाला अहमदउल्ला शाह नानासाहेब पेशवा यांना पकडू शकले नाही. सर्व प्रकारच्या अपयशानंतरही मौलवी अहमदउल्ला शाहने आपला आत्मविश्वास राखला.

आपल्या विद्रोही सिपायांना एकत्र करून एक निर्णायक युध्द लढण्याची तयारी त्यांनी केली.यासाठी त्यांनी शाहजहॉनपूर जवळ एक छोटे राज्य पुवायाचा राजा जगन्ननाथसिंह यांच्याकडे जीनत महलची मोहर लावून एक पत्र पाठवले.आणी भेटग्याची इच्छा व्यक्त केली.पण राजा जगन्ननाथ सिंहने पत्राच्या उत्तरात लिहीले की ते मौलवीची स्वतः भेटू घेउ इच्छितो.त्याचे आमत्रण आल्यावर मौलवी अहमदउल्ला शाह एका हत्तीवर बसून पुवायाला पोहचले.तेथे गेल्यावर त्यांना आर्श्चर्याचा धक्का

कला त्याच वळस जगन्नाथासहच्या भावान त्याच्यावर गाळा चालवला.मालवाला अबारात गाळा लागताच त्याचा त्याच जागी मृत्यू झाला.ज्या योध्दयाला इंग्रज पकडू शकले नाही आणी ठारही मारू शकले नाही ते आपल्याच देशातील एका गद्याराने त्याचा घात केला.

जगन्नाथ सिंहने मौलवी अहमदउल्ला शाहचा सिरछेद करून त्यांचे मुंडके एका लाल कपडयात झाकून तेथून १३ मैल लांब असलेल्या शहाजहॉपूर येथे इंग्रजांच्या छावणीत घेउन गेला.त्याला त्या दूष्कृत्याबद्दल इंग्रजांनी त्याला ५० हजार रूपये दिले.

१८५७ चा उठाव अयशस्वी झाला पण त्यानी आपल्या मागे स्वातंत्र्य प्राप्तीची आणी इंग्रजी राज्याची समाप्तीची एक मोठी परंपरा मागे सोडून गेले. याच परंपरेन कुका आंदोलनाचे हुतात्मे रामबिहारी बोस, राप्रसाद बिसमील असफाकउल्ला खान चंद्रशेखर आझाद यांच्या सारखे अनेक क्रांतीकारकाचा उदय झाला.

**संदर्भ ग्रंथ सुची :**


०१) १८५७ चे स्वातंत्र्य समर --------वीर सावरकर

०२) १८५७चा जिहाद --------शेषेराव मोरे

०३) आजकल -साहित्य और संस्कृती का इतिहास-मे २००७

०४) स्वांतंत्र्य लढयातील भारतीय मुसलमान--सातिमोय रे अनु.आलिम वकील

०५) १८५७ तारिख बगावते हिंद-पंडित कन्हैय्या लाल